<u>**रे. मु. क. २१/२०१०**</u>
(CNR No.MHAK07-000151-2010)

**: <u>निशाणी क. ७५ वर आदेश</u> :**

१. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २२, नियम ०३ प्रमाणे दाखल प्रस्तुत अर्ज त्यांना वादीचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. दाव्यातील वादी हे अर्जदार क. १ चे पती आणि अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील आहेत. वादी हे दिनांक ०५.१०.२०१८ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांन वादीच्या मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली. वादीच्या मृत्युनंतर अर्जदारांना सदर दावा पुढे चालवायचा आहे. प्रतिवादीने अर्जास हरकत घेवुन अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

२. अभिलेख पाहिला असता प्रस्तुत दाव्यात वादी रमाकांत शालीग्राम पल्हाडे हे दिनांक ०५/१०/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्याबाबत मृत्यु दाखल्याची झेरॉक्स प्रत कागदपत्र दाखल यादीसोबत दाखल केली आहे. अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वरील परिस्थीतीत दावा चालविण्याचा हक्क शाबीत असल्याने अर्जदारांना / वादीच्या वारसांना अभिलेखावर घ ेवून सरनाम्यात दुरूस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजुर करणे न्यायाचे हितास्तव आवश्यक झालेले आहे. सबब प्रस्तुत अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांना वादीचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यात येते.

३. अर्जदारांनी दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी.

४. अर्जाचा खर्च अर्जदारांवर ठेवण्यात येतो.

सही/-

(चं. प्र. रघुवंशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर.

बाळापूर.
दिनांक : १७.११.२०१८.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.V. Indane. |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 17/11/2018. |
| Signed by Presiding Officer on | : | 17/11/2018. |
| Uploaded on | : | 17/11/2018. |

---------------------------------------------------------------------------------------